# नाईट कॉलेज'मध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि करिअरच्या संधी यावर कार्यशाळा संपन्न




**कोल्हापूर:**

कौन्सिल ऑफ एज्युकेशन चे नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर येथील वाणिज्य विभागाच्या वतीने 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि करिअरच्या संधी' (Artificial Intelligence and Career Opportunities) या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली.

कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून पुणे येथील निलया फाऊंडेशनचे श्री. चेतन गोडबोले उपस्थित होते. त्यांनी बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात 'एआय'चे महत्त्व स्पष्ट करत विद्यार्थ्यांना या क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या विविध रोजगाराच्या संधींची सविस्तर माहिती

दिली. भविष्यात वाणिज्य क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाची सांगड कशी घालावी, यावर त्यांनी विशेष मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. उत्तम पाटील सर होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात तंत्रज्ञानाशी अपडेट राहणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. अभिजीत कांबळे यांनी केले. त्यांनी या कार्यशाळेच्या आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली.

यावेळी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप बी.कॉम भाग-३ चा विद्यार्थी रोहित बोंगळे याने आभार मानून केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभाग प्रमुख डॉ शंकर पवार यांनी केले.